INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 10 | NOVEMBER – 2024

# मुस्लिम मराठी साहित्य : संकल्पना आणि स्वरूप

डॉ. वसंत गायकवाड
सी.जे.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिरोडा.
जिल्हा– गोदिंया,(महाराष्ट्र)



स्वातंत्र्योत्तर कालखंडात समाजव्यवस्थेत दुर्लक्षित राहिलेले, शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजाचे विविध घटक अधिक सक्रिय आणि सजग झाले. घटनेने दिलेली हक्क आणि अधिकाराची जाणीव व सार्वत्रिक शिक्षणामुळे आलेले आत्मभान यासाठी कारणीभूत असावे. स्वातंत्र्याच्या चळवळीत या सर्व समाजघटकांचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहभाग होताच. त्यामुळे स्वाभाविकच स्वातंत्र्यानंतर या देशात नवा समाज अस्तित्वात येईल अशी या सर्व समाजघटकांची अपेक्षा होती; किंबहुना शोषणमुक्त, समताधिष्ठित समाजाचं स्वप्न स्वातंत्र्य चळवळीचं नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांनी या सामान्य माणसांसमोर ठेवलं होतं. कालांतरानं स्वातंत्र्य मिळालं. सर्वांना सामान लेखणारी घटनाही अस्तित्वात आली. स्वातंत्र्यापूर्वी पाहिलेलं ते शोषणमुक्त, समताधिष्ठित समाजाचं स्वप्न प्रत्यक्ष वास्तवात साकार झालच नाही. यामुळे या उपेक्षितांच्या वाट्याला कमालीचा भ्रमनिराश आला. आपला विश्वासघात झाला ही वेदना देणारी वैफल्यग्रस्त जाणीव निर्माण झाली. मग हे सजग झालेले घटक आपल्या वेदना आणि व्यथा साहित्याच्या व्यासपीठावर नोंदवू लागले. या प्रक्रियेतूनच दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य अशा अनेक नव्या साहित्यप्रवाहांचा उदय झाला. 'मुस्लिम मराठी साहित्य' हाही असाच एक नवा साहित्यप्रवाह आहे. या नव्या प्रवाहांनी मराठी साहित्यविश्वातील अभिजनांची मक्तेदारी संपुष्टात आणली आणि शोषित वंचितांच्या वेदनेची गोजिरी पावले मराठी मातीत आपली पदचिन्हे अधिक आत्मविश्वासाने निर्माण करू लागली. मराठी साहित्याच्या अनुभवांचे क्षितीज अधिक विस्तारीत झाले. ते व्यापक झाले आणि समृद्धतेच्या दिशेने वाटचाल करू लागले.

'मुस्लिम मराठी साहित्य' ही संज्ञा सर्वप्रथम सांगलीचे मुस्लिम विचारवंत सय्यद अमीन यांनी 1936 च्या दरम्यान वापरली. ''सय्यद अमीन यांनी 'मुस्लिम मराठी साहित्य पत्रिका' संपादन करून, चालवून वापरली असल्याचे दिसून येते.''[1] आज महाराष्ट्रातला 76 टक्के मुस्लिम समाज मराठी भाषा जाणतो, वाचतो आणि अभ्यासतो. तो मराठीचा वापर करतो. साहजिकच मराठी भाषा त्याने आपल्या साहित्यासाठी माध्यम म्हणून स्वीकारली. त्यामुळे त्याने निर्माण केलेल्या साहित्याला 'मुस्लिम मराठी साहित्य' असे संबोधण्यात येऊ लागले.

1990 साली अखिल भारतीय मुस्लिम साहित्य परिषदेची स्थापना झाली. मुस्लिम मराठी साहित्यावर चर्चा सुरू झाली. मुस्लिम लेखकांना आपले हक्काचे व्यासपीठ मिळाले. या परिषदेमुळे मुस्लिम साहित्य महाराष्ट्रात चर्चेचा विषय झाले. 1960 नंतर मुस्लिम लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्याला कोणते शीर्षक द्यावे हा अनुत्तरित प्रश्न होताच. स्वाभाविकच या सर्व साहित्याला 'मुस्लिम मराठी साहित्य' या संज्ञेखाली स्वीकारले गेले.

15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. मध्यरात्री स्वातंत्र्याचा जल्लोष हा देश साजरा करीत असताना या देशाला फाळणीचे गालबोट लागले. एका बाजूला स्वातंत्र्याचा आनंद, दीडशे वर्षांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्याचा आनंदसोहळा हा देश साजरा करीत होता तर त्याच वेळी फाळणीचे, आपल्याच देशबांधवांच्या

हिंसेचे, हत्यांचे करुणगंभीर दृश्यही तो भयभीत .नजरेने बघत होता. भारताचा राष्ट्रपिता फाळणीच्या काळी निर्माण झालेल्या दंगली शांत करण्याचा प्रयत्न करीत होता. कारण महात्म्याच्या आणि सर्वसामान्य गोरगरिबांच्या स्वप्नातील हा भारत नव्हता. म्हणूनच 'उषकाल होता होता काळरात्र झाली' ही काव्यपंक्ती खरी ठरली. आधुनिक भारताचा पाया या वैमनस्याच्या पायावरच उभा राहिला. त्याची कडू फळे स्वातंत्र्याच्या 68 वर्षात भारताच्या सामाजिक जीवनात अनेक वेळा प्रकट होतात. मानवतेला कलंकित करीत राहतात. निरपराध सर्वसामान्य माणसांचे जीवन उद्ध्वस्त करीत राहतात ही वस्तुस्थिती आहे.

भारताची फाळणी झाली. पाकिस्तान नावाचा नवा देश अस्तित्त्वात आला. फाळणी केवळ जमिनीची झाली नाही, ती माणसांचीही झाली. धर्माच्या अनुयायांचीही झाली, हिंदूंचीही झाली आणि मुस्लिमांचीही झाली. ज्यांना फाळणीचे संदर्भ कळत नव्हते, त्यामागचे राजकारण समजत नव्हते, ज्यांच्या पिढ्यान्पिढ्या इथल्या मातीत जन्मल्या आणि मातीमोल झाल्या होत्या, जो इथल्या ग्रामीण भागात वसत होता, ज्याच्या रोजीरोटीचे साधन इथल्या मातीशी आणि ग्रामीण जीवनाशी जोडलेले होते, जो अशिक्षित होता अशा मुसलमानांना फाळणीचा दोषी ठरविण्यात आले. इथल्या जहाल धर्मांध शक्तींनी त्याला सत्ताप्राप्तीच्या राजकारणासाठी लक्ष्य केले तर दुसरीकडे मुस्लिम धर्मांध शक्तिंनीही त्याचा वापर आपल्या बचावासाठी, राजकारणासाठी, स्वार्थासाठी करून घेतला. धार्मिक द्वेष त्यालाच सोसावा लागला. दंगलीत त्याचीच वस्ती बेचिराख झाली. त्याच्याच कुटुंबातील निरपराध माणसे दंगलीत मारली गेली. ही प्रचंड गळचेपी, ही अंतरीची घुसमट, दहशतीच्या वातावरणात भीत– भीत जगणारा हा सामान्य मुस्लिम माणूसच आपलं दुखानं तुडुंब भरलेलं ह्रदय अभिव्यक्त होण्याची वाट बघू लागला. व्यासपीठ मिळताच तो बोलू लागला आणि मुस्लिम मराठी साहित्य आकाराला आले.

महाराष्ट्रातील मुस्लिम समाज हा इथल्या भूमिपुत्रांचाच समाज आहे. ''इथले मुसलमान हे काही अरब, तुर्क, पठाण यांचे वंशज नसून ते 'अश्रफ' संस्कृतीचे नाहीत. त्यामुळे त्यांची मनोरचनाच वेगळी आहे.''[2] कारण यातील बहुतांश समाज धर्मांतरित समाज आहे. ''मुसलमान म्हणून त्याच्या भावसंवेदना, वेदना हया मुस्लिमेतर बहुजन समाजापेक्षा वेगळ्या निश्चितच नाहीत.'[3] तो स्थानिक आणि तसाच तो वांशिकदृष्ट्याही इथलाच आहे. बहुजन समाजाची जातिव्यवस्था आणि संस्कृतीही त्याने स्वीकारलेली आहे. हा मुस्लिम समाज महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात वर्षानुवर्षे राहात आहे. हा खेड्यातील इतर समाजाप्रमाणेच शेती, मजुरी, व्यापार करणारा हा समाज आहे. खेड्यातील या मुस्लिम समाजाचे भावबंध इतर समाजाशी स्नेहाचे राहिलेले आहेत. परस्परांच्या सणसमारंभात आणि उत्सवात तो आनंदाने आणि सन्मानाने सहभागी होत राहिलेला आहे. त्याची संस्कृती आणि भाषा महाराष्ट्रीय बहुजनांचीच संस्कृती आणि भाषा असल्याचे जाणवते. महाराष्ट्रातील असा हा शांतिप्रिय मुस्लिम समाज इतर धर्मीय समाजाबरोबर आनंदाने आपले जीवन व्यतीत करीत होता. स्वातंत्र्यानंतर खेडे आधुनिक बनू लागली. लोकशाहीतील राजकारणाचा विशेषत पक्षीय राजकारणाचा गलिच्छ प्रभाव खेड्यांवर पडू लागला. हिंदू–मुस्लिम दंगलींचा आणि प्रसारमाध्यमांद्वारे प्रचलित होणाऱ्या हिंदू–मुस्लिम संबंधाचा परिणामही खेड्यातील हिंदू–मुस्लिम सहजीवनावर पडला. मुस्लिमांकडे संशयाने बघितले जाऊ लागले. त्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले. त्याला उपरा ठरविण्यात आले. यातूनच ''सर्वसामान्य महाराष्ट्रीय ग्रामीण मुस्लिमांसमोर त्याच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आणि तो मी कोण? याचा शोध घेऊ लागला.''[4] नव्या आत्मभानाने तो या बदललेल्या सामाजिक परिस्थितीत त्याच्या जीवनासंदर्भात उभ्या झालेल्या प्रश्नांना उत्तरे शोधू लागला. मग त्याला कळले माझा धर्म परकीय असेल परंतु मी परका नाही. माझी जीवनशैली इथल्याच मातीतून निर्माण झाली आहे. मी याच मातीतून तयार झालो आहे. यातूनच मुस्लिम मराठी साहित्याची मुहूर्तमेढीची पार्श्वभूमी तयार झाली.

मुस्लिम साहित्याच्या निर्मितीच्या अंगाने शोध घेत असताना महाराष्ट्राची सामाजिक जडणघडण लक्षात घेणेही आवश्यक आहे. महाराष्ट्रातील प्रबोधनाची चळवळ, ब्रिटिशांनी इथे लागू केलेल्या सुधारणा, सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार, जोतीराव फुलेंची शैक्षणिक–सामाजिक क्रांती, या भूमीत झालेली वाङ्मयीन क्रांती, आंबेडकर, शाहू महाराज यांनी इथे चालविलेल्या दलित–शोषितांच्या उत्थानाच्या चळवळी या साऱ्यांच्या परिणामातून मराठी समाज ढवळून निघत होता. स्वातंत्र्याच्या चळवळीने अधिक गतिमानता प्राप्त केल्यामुळे प्रबोधनाच्या आणि परिवर्तनाच्या या चळवळी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातही अस्तित्व टिकवून राहिल्या. इथल्या पीडित समाजाला विचारप्रवृत्त करण्याचं कार्य या चळवळींनी केलं. दलित–वंचितांना यामुळेच नवं आत्मभान आलं. स्वातंत्र्यानंतर मात्र आत्मभान प्राप्त झालेली, नव्या शिक्षणानं संस्कारित झालेली नवी पिढी, प्रचलित सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेत आपल्या अस्तित्वाचा अधिक प्रखरतेने शोध घेऊ लागली. धर्माच्या नावाखाली आर्थिक,

राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्या दडपल्या गेलेल्या तळागाळाच्या माणसांना आत्मभान येण्याची गतिमान प्रक्रिया सुरू झाली. भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकाराच्या आधारे हे दबलेले घटक आपल्या न्याय्य हक्काची मागणी अधिक प्रभावीपणे करू लागले. आपल्या हक्कासाठी भांडू लागले. ज्या समाजाने त्यांना नाकारले त्या नाकारलेपणाची कारणमीमांसा फुले आणि आंबेडकरांच्या साहायने विचारू लागले. जेव्हा या शोषणाची कारणे समाधानकारक मिळाली नाहीत तेव्हा हया दबलेल्या वर्गाने आपली तीव्र प्रतिक्रिया साहित्याच्या व्यासपीठावर नमूद करायला सुरुवात केली. दलितसदृश मुस्लिम वर्गही याच भूमिकेवर उभा राहिला. यातूनच मुस्लिम मराठी साहित्याची पदचिन्हे मराठी साहित्यात अवतरली. म्हणूनच डॉ.जुल्फी शेख म्हणतात, ''काही कालबाह्य गोष्टी टाकून देण्याचे शहाणपण या पिढीला सुचले आणि जाणिवेला अर्थ आला. प्रश्न मांडण्याचे धारिष्ट देणाऱ्या समतावादी आदर्श जोड्या कलावंताशी संवादी झाल्या. मार्क्स, गांधी, महर्षी शाहू, पेरियार, फुले, बाबासाहेब हे माणूस म्हणून, चेतना म्हणून, भोगवट्याचे एक–एक प्रतिनिधी म्हणून समोर आले.''[5] माणसांच्या जगण्यातल्या प्रश्नांचा शोध ईश्वरी अधिष्ठानात न शोधता ही नवी आत्मभान आलेली पिढी सभोवतालच्या वास्तवात शोधू लागली आणि नव्या भूमिकेतून साहित्यनिर्मिती होऊ लागली.

स्वातंत्र्य चळवळीत मुसलमानांनी भाग घेतला नाही, असे मिथक निर्माण करण्यात येते. वास्तविकता ही आहे की, अनेक मुस्लिमांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतलेला आहे. ''अर्थात मुसलमानांच्या देश भक्तीविषयी संशय घेणे हा अपराध आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मुस्लिमांचे योगदान मोठे आहे.''[6] स्वातंत्र्य आंदोलनात अशफाक उल्ला खान याला फाशीची शिक्षाही झालेली आहे. ''आझाद हिंद फौजेतल्या इरशाद अली आणि कासम अली यांना सहजपणे विसरता येईल काय?''[7] भारत–पाकिस्तानच्या युद्धात अब्दुल हमीदचा पराक्रम नाकारणे शक्य आहे काय? भारतीय इतिहासातील राष्ट्रवादी मुस्लिमांची देशनिष्ठाही वादातीत आहे. या पार्श्व भूमीवरही मुस्लिमांच्या देश भक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जातात. त्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर शंका उपस्थित केल्या जातात. परंतु इथल्या मातीत पिढ्यान्पिढ्यांपासून राहणाऱ्या सामान्य मुस्लिमांचा यांच्याशी काय संबंध? मला वाटते मुस्लिम मराठी साहित्य या अस्तित्वाच्या प्रश्नांना दिलेलं समर्पक आणि यथार्थ उत्तर आहे.

मराठी साहित्यात मुस्लिम समाजाचे अवास्तव आणि एकांगी चित्रण करण्यात आले. असे चित्रण मराठीतील प्रथितयश लेखकांनी केले. यात सावरकर, भावे, आपटे, पेंडसे इत्यादी लेखकांचा समावेश होतो. यातून जिहादची भाषा करणारा, दंगली घडवून आणणारा, दुसऱ्यांच्या बायका पळविणारा, हिंसक, खलनायकी असा मुसलमान साहित्यातून उभा करण्यात आला. यामुळे मुस्लिम माणसाची प्रतिमा मलिन झाली. त्याची सामाजिक कोंडी झाली. त्याचे अस्तित्व नाकारले गेले. या पार्श्वभूमीवर मुस्लिमांकडे मुस्लिम म्हणून न बघता एक माणूस म्हणून बघणे आवश्यक आहे. त्याचे वास्तव जीवन जीवनातील सर्व आर्थिक, सामाजिक ताणांसह मराठी साहित्यात आविष्कृत होणे गरजेचे आहे. म्हणूनच ''मुस्लिम मराठी साहित्य हे पूर्वग्रहदूषित दृष्टीतून मांडू पाहणाऱ्या पारंपरिक जीवनाची पुनर्मांडणी करू पाहात आहे. त्यातून पूर्वगृहदूषित नजरांनाही ते प्रतिक्रिया देत आहे.''[8] आपल्या वास्तव प्रतिमेचे मराठी साहित्यात पुनस्थापना करण्याच्या गरजेतूनही मुस्लिम मराठी साहित्याचा प्रवाह निर्माण झालेला आहे.

1990 साली सोलापूर येथे भरलेल्या अखिल भारतीय मुस्लिम साहित्य संमेलनातूनच 'मुस्लिम मराठी साहित्य' चळवळ खऱ्या अर्थाने उदयास आली. 1970ला हमीद दलवाई यांनी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' स्थापन केले. या मंडळाने आपल्या कार्याच्या माध्यमातून मुस्लिम माणसाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडात यु.म.पठाण आणि हमीद दलवाईंसारखे लेखक मुस्लिम समाजजीवनाचे मूलभूत प्रश्न साहित्यातून मांडत होतेच. या साहित्यिकांनी मुस्लिम प्रश्नांना आपल्या साहिततून मांडत साहित्यकृतींद्वारे स्पर्श केला. ''असे असले तरी मुस्लिम साहित्यनिर्मितीसाठीची ही जाणीवपूर्वक अभिव्यक्ती नव्हती''[9] हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. दलवाईंनी स्थापन केलेल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाने शरियत, तलाक, मुस्लिम पुरुषांची चार लग्ने या प्रश्नांच्या संदर्भात पुरोगामी विचार घेऊन आक्रमकपणे आपला विचार मांडला. महाराष्ट्राच्या विविध प्रांतांतून त्यांना प्रतिसादही मिळाला. पुरोगामी विचार घेऊन पुढे आलेली ही चळवळ सामान्य माणसांपर्यंत पोहचू शकली नाही. कारण या चळवळीचा केंद्रबिंदू धर्मसुधारणा हाच राहिला. हमीद दलवाईंची वादग्रस्त भूमिकाही याला कारणीभूत ठरली. यातूनच पुढे मुस्लिम साहित्य चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली. आजपर्यंत या चळवळीने जवळपास दहा साहित्य संमेलने आयोजित केली आहेत.

## संदर्भ टिपा


(1) देशमुख नसीम एहतेशाम ''मुस्लिम मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा'', मुस्लिम मराठी साहित्य चळवळ, प्रथमावृत्ती, 2013 पृ. 3

(2) बेन्नूर फकुद्दीन लेख ''महाराष्ट्रातील मुसलमान'', अ.भा. मुस्लिम मराठी साहित्य परिषद पत्रिका, सोलापूर, 1992 पृ. 4

(3) पठाण अक्रम ''मुस्लिम मराठी साहित्य'', युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 2014 पृ. 27

(4) सय्यद महेबुब ''मुस्लिम मराठी साहित्य : एक आकलन'', सावित्रीबाई फुले प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती पृ. 29

(5) शेख के.टी. (जुल्फी) ''नवे प्रवाह नवे स्वरूप'', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 2004 पृ. 05

(6) काळे अक्षयकुमार (संपा.)''सांप्रदायिक सद्भाव आणि सामाजिक शांतता''(कुलगुरू डॉ. श.नु.पठाण गौरव ग्रंथ), ग्लोबल हेल्थ केअर ॲण्ड एज्युकेशन फाऊंडेशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2011 पृ. 135

(7) शहाजिंदे फ.म.''अनुभव'', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1997 पृ. 54

(8) शहाजिंदे, प्रा.फ.म., तांबोळी प्रा.फारुख (संपा.)''मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप'', पृ. 147

(9) दवणे राजरत्नलेख – ''अल्पसंख्यांक मुस्लिम साहित्य अभिव्यक्ती – अल्पसंख्यांकाचे विचारविश्व'' (चर्चासत्राची स्मरणिका), न्यू वारसेस पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2013 पृ. 400